# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०८.०७.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**गिट्टीखदान पोलीसांची कामगीरी :— चोरीचा गुन्हा उघडकीस. ०२ आरोपींना अटक.**

फिर्यादी दुर्गादास उके वय ५९ वर्षे, रा. लिंबोनी नगर, मेकोसाबाग, जरीपटका हे प्रेस्टीज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. अंतर्गत पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत जाफर नगर, दिल्ली दरबार हॉटेल समोरील नवनिर्माणाधीन सातमाळ्याचे बिल्डींग येथे साईट इंचार्ज म्हणुन काम करतात. त्याठिकाणी इलेक्ट्रीक फिटींगचे काम सुरू असून, एका फ्लॅटमध्ये पॉलीकॅब कंपनीचे इलेक्ट्रीक वायर किंमती ७०,०००/—रू. चा मुद्देमाल ठेवला होता. दिनांक ३०.०५.२०२६ चे १५.०० वा. ते ३१.०५.२०२६ चे १४.३० वा. दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोराने फ्लॅटमध्ये प्रवेश करून नमूद मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा पाठपुरावा करीत असता, दिनांक ०१.०६.२०२६ चे १६.५८ वा. चे सुमारास, गिट्टीखदान पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत रामदेव बाबा टेकडी मंदीरामागील परीसरात पेट्रोलिंग करीत असता, त्यांना एका काळ्या निळ्या रंगाची हिरो होन्डा पॅशन प्रो मोटारसायकल क्र. एमएच ३१ ए.झेड ५५१५ यावर दोन मुले एका हिरव्या रंगाच्या प्लॅस्टीक बोरीसह संशयीतरित्या जातांना दिसून आले. त्यांना थांबण्याचा ईशारा केला असता, ते पोलीसांना पाहुन वाहनासह पळू लागले. त्यांचा पाठलाग करून ताब्यात घेवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपले नावे क्र. १) शुभम वामन पूसतोडे वय २५ वर्षे, रा. गोरेवाडा, प्रेमसेवा शाळेजवळ, मानकापूर, नागपूर २) सुशील उर्फ दादू श्याममरकाम वय २५ वर्षे, रा. बॅक कॉलोनी, गॅलेक्सी अपार्टमेन्ट, जरीपटका, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष त्यांचे जवळील बोरीची पाहणी केली असता, त्यामध्ये जळालेले इलेक्ट्रीक तार वजनी २० कि.ग्रॅ. मिळून आले. इलेक्ट्रीक तारबाबत विचारणा केली असता, त्यांनी संगणमताने वर नमुद गुन्हा केल्याची कबूली दिली. आरोपींचे ताब्यातुन जळालेले इलेक्ट्रीक तार वजनी २० कि.ग्रॅ. व गुन्ह्यात वापरलेली हिरो होन्डा पॅशन प्रो मोटरसायकल असा एकुण किंमती ७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) व मवपोनि. श्रीमती ललिता तोडासे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. चेतन बोरखडे, सफौ. अनिल त्रिपाठी, पोहवा. दयाशंकरांनी बिसांद्रे, विशाल नांदेकर, पोअं. राहुल पांडे व अविनाश पांडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे यशोधरानगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी पिंटू रामभाऊ रामटेककर, वय ३९ वर्षे, रा. जयभोले नगर, यशोधरानगर नागपूर यांचे बर्डी नागपूर येथे सचिन इलेक्ट्रॉनिक्स नावाचे मोबाईल व ईतर इलेक्ट्रीक वस्तू खरेदी विक्रीचे दुकान आहे. या निमित्ताने आरोपी नामे विवेक वसूले, रा. गल्ली नं. ०५, गरोबा मैदान, शनिमंदीरजवळ, आदर्श नगर, लकडगंज, नागपूर याचेसोबत ओळख झाली होती. आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करून, भागीदारीमध्ये व्यवसाय सुरू करण्याचे खोटे आमिष फिर्यादीस दाखवून, फिर्यादीचे नावाचे विविध बॅकेचे क्रेडीट कार्ड तसेच, बचत खात्याचा वापर करून एकुण १३,३२,६०९/—रू. रकमेचा वापर स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी करून घेतला. अशा प्रकारे आरोपीने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे मपोउपनि. दिप्ती घाटे ७७७६८०६५१६ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कळमना:— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०५.०७.२०२६ चे २०.१५ वा. चे सुमारास, फिर्यादी राजेश रतन शाहु, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ६४, विजय नगर, श्रीगणेश मंदीर जवळ, कळमना, नागपूर हे त्यांचे हिरो पॅशन प्लस एम एच ३१ सी टी ५१२१ ने पोलीस ठाणे कळमना हद्दीतील लक्ष्मीनगर चौक, दारू भट्टीजवळून जात असता, एका मोटरसायकल क्र. एम.एच. ४९ बी.जे. २५९० चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोटारसायकलला समोरून धडक मारल्याने फिर्यादी गंभीर जखमी झाले. जखमी फिर्यादीचा उपचार मेयो हॉस्पीटल येथे करण्यात आला आहे.

याप्रकरणी दिनांक ०७.०७.२०२६ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. निलेश कुलसंगे ९८३४२१९७४१ यांनी आरोपी मोटरसायकल चालकाविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या.सं., अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** कु. अंजली संजय डड्मवार, वय २० वर्षे, रा. न्यु सोमवारी, रघूजी नगर, क्वॉर्टर नं. १५४!६७ श्रीकृष्ण मंदीर जवळ, हुडकेश्वर, नागपूर ही दिनांक ०६.०७.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— पांढऱ्या रंगाचा टॉप आकाशी रंगाचे ठिपके असलेला व काळ्या रंगाचा

पॅन्ट तसेच पायात हिरव्या रंगाची चप्पल घातलेले आहे. व सोबत कॉलेज बॅग काळ्या रंगाची आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** सौ. आरती कन्हैय्या शर्मा, वय २५ वर्षे, सोबत मुलगा नामे आर्यन कन्हैय्या शर्मा, वय ०५ वर्षे रा. श्रीकृष्ण नगर मानेवाडा कल्पना खोडेच्या घरी किरायाने, बेसा रोड, हुडकेश्वर, नागपूर ह्या दिनांक ३०.०६.२०२६ चे १३.०० वा. यांचेसह पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **शितल वर्णन** —रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— ब्राऊन, भाषा— हिंदी बोलतात. अंगात— ब्राऊन रंगाचा सलवार सुट घतलेला आहे. **आर्यन वर्णन**— रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ३ फुट, केस— ब्राऊन, भाषा— हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे कोतवाली :—** राजेंद्र रामचंद्र गोरे, वय ५२ वर्षे, रा. प्लॉट नं. १५७, लक्ष्मीनारायण मंदीरजवळ, नंदनवन, नागपूर हे दिनांक ०७.०७.२०२६ पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ७ इंच, केस— काळे—पांढरे, अंगात— पांढऱ्या रंगाचा प्रिन्टेड शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**४) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** शुभम क्रिष्णा करपाते, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. ११, सर्वश्री नगर, नवनाथ आयटीआय रोड, सर्वश्री शाळेसमोर, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक ०४.०७.२०२६ चे १४.०० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे व समोरून टक्कल पडलेले, अंगात— पिवळ्या रंगाचा टि—शर्ट व निळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**५) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** राजु सतिष चौधरी, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ५२, उदय नगर, ब्रम्हकुमारी मार्ग, बोपचे यांचे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक ०१.०७.२०२६ चे १२.३० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबूत, उंची— ५ फुट ६ इंच, केस— पूर्ण टक्कल पडलेले, अंगात— हिरव्या रंगाचा चौकडीचा शर्ट व क्रिम रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**६) पोलीस ठाणे जरीपटका :—** सौ. मानिका युवराज चौहान, वय ३० वर्षे, रा. बाराखोली, महादेव पानठेल्या जवळ, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक ३०.०६.२०२६ चे १३.०० वा. यांचेसह पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** —रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— ब्राऊन, भाषा— हिंदी बोलतात. अंगात— ब्राऊन रंगाचा सलवार सुट घतलेला आहे.



अंजली



आरती व आर्यन



राजेंद्र



शुभम



राजु



मानिका

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**